नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/१०/२०२६ (रविवार )

## ४७.६२ ग्रॅम अंमली पदार्थ एमडी (मेफेड्रोन पावडर) सह २ लाख ६८ हजारांचा मुद्देमाल जप्त, ४ आरोपी अटक
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन बुटीबोरी :– **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी नागपूर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक १७/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, अंमली पदार्थ विरोधी पथक यांच्या सह बुटीबोरी पोलीसांनी संयुक्तरित्या कारवाई करत ४७.६२ ग्रॅम अंमली पदार्थ एमडी (मेफेड्रोन पावडर) जप्त करून ४ आरोपींना अटक केली आहे.**

दिनांक १७/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक नागपूर उपविभागात संयुक्तिरीत्या पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ बाबत खात्रीशिर माहीती दिली की, नागपूर–बोरी मार्गावरील बोथली फाटा येथे फिरोज इब्राहिम खान हा एमडी अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार आहे. नमुद पथकाने सदर माहीती वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना देवुन बुटीबोरी पोलीसांसह संयुक्त कारवाई केली. पेट्रोलींग करीत असतांना मौजा बोथली फाटा परिसरात नमुद पथकाला एक इसम संशयास्पदरित्या मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याचे नाव **आरोपी क्र १) फिरोज इब्राहिम खान, वय ३५ वर्षे, रा. वार्ड नं. ९, जुनी वस्ती, लाकडी टाल जवळ, बुटीबोरी** असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची झडती घेतली असता ८.१७ ग्रॅम अंमली पदार्थ एमडी (मेफेड्रोन पावडर) मिळुन आला. सदर आरोपी यास एम.डी अंमली पदार्थ कोठुन आणला याबाबत विचारणा केली असता सदर माल हा त्याचा साथीदार नामे २) मोहसिन अब्दुल बेरा, रा. बुटीबोरी याचेकडुन विक्री साठी आणला असे सांगितले.

पोलीसांनी सदर प्रकरणी साखळी पुरावे जोडून सदर गुन्हयात **आरोपी क्रं २) मोहसिन अब्दुल बेरा, वय ४२ वर्षे, रा. वार्ड क्र. ९, बुटीबोरी ३) एहफज उर्फ लक्की अहमद खान वय २६ वर्ष रा. शिवनकर नगर, खरबी चौक नागपुर ४) फारुख मुलताज शेख वय २५ वर्ष रा रोशन नगर नागपूर** या आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न करून त्यांना नागपुर शहरातुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. आरोपी क्र २) मोहसिन कडुन ४.३३ ग्रॅम एमडी , आरोपी क्र ३) एहफज उर्फ लक्की कडुन १७.३२ ग्रॅम एमडी, आणि आरोपी क्र ४) फारुख याचे कडुन १७ .८० ग्रॅम अंमली पदार्थ एमडी जप्त करण्यात आला.

सदर कारवाई मध्ये **आरोपीच्या ताब्यातुन एकुण ४७.६२ ग्रॅम अंमली पदार्थ (मेफेड्रोन पावडर) किंमती २,३८,१००/—रुपये , ०३ अॅडरॉईड मोबाईल असा एकुण २,६८,१००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम ८(क), २० (ब) ,२९ एन.डि.पि. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. चारही आरोपींना अटक करण्यात आली आहे. साखळी पुरावे जोडुन नागपूर ग्रामीण पोलीस पुढील तपास करीत आहे.**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत दिनांक १७/१०/२०२६ रोजी पोलीस स्टेशन बेला येथे खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन बेला** :— पोलीस उपनिरीक्षक श्री हरिचंद्र मोरे, पोलीस स्टेशन बेला यांनी पोलीस स्टेशन बेला हद्दीतील मानस ॲग्रो कंपनी खुर्सापार बेला येथील कामगार महीला यांची मीटिंग घेऊन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास १०० ते १२० महिला कामगार उपस्थित होत्या.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक, तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३०**

वर संपर्क साधावा किंवा **cybercrime.gov.in** या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न  हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.





# अवैध जुगार खेळणाऱ्यांवर ०२ गुन्हे नोंद.

दिनांक १७/१०/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन नरखेड, कोंढाळी यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या तसेच सट्टापट्टीचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ७८९५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन कोंढाळी, नरखेड मध्ये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** आरोपी नामे शेख जमिर शेख बसीर, वय २४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४, मोवाड हा हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत** आरोपी नामे १. प्रफुल चंद्रमणी, २. प्रशोत्तम खूरपडे, वय ३२ वर्ष, ३. संजय येडमे, वय ३० वर्ष, ४. शुभम उईके, वय ३० वर्ष, ५. प्रमोद डईके, वय ३२ वर्ष, ६. संदिप गणेश मारबते, वय ३२ वर्ष, सर्व रा. कचेरी सागंवा, ता. काटोल, जि. नागपूर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने एकुण ०६ आरोपींविरूद्ध ०१ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन बोरी :—** दिनांक १७/१०/२०२६ रोजी बोरी पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी नामे राहुल संदिप मेश्राम, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र ०३, चिकलधोकडा, ता. उमरेड, जि. नागपुर हा मौजा बुट्टीबोरी दर्डा रेस्ट हाउस लोकमत कॉलनी येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरतांना मिळुन आला. तसेच आरोपी सुनिल कलीराम कुसराम, वय ४० वर्ष, रा. रंगीन खापा, ता. छिंदवाडा हा मौजा सोनेगाव वाठोडा येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरतांना मिळुन आला. सदर इसमास त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीतांचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर
## एन.डी.पी.एस कायदयान्वये ०३ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १७/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी गोपाल गारसूजी उइके, वय ५४ वर्ष, रा. भारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी नामे पियांशू शंकर तामखाने, वय १८ वर्ष, रा. आंबेडकर नगर, वार्ड क्र ०१, राजूरा जि. चंद्रपूर, ह.मू सातगाव किन्हाळा, ता. हिंगणा, जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी नामे सूमित रतन रंगारी, वय २० वर्ष, राह. रमा नगर, वाचनालय रोड कामठी नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ११ गुन्हे दाखल,

**दिनांक १७/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ११ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) युवराज उर्फ नीखील हरी पवार, वय ३५ वर्ष, रा. महाजन ले आउट सावनेर २) जमिल रशीद शेख, वय ३१ वर्ष, रा. अवधुतवाडी सावनेर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे प्रेमचंद बळीराम शेंडे, वय ५३ वर्ष, रा. कोथूळणा यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १. प्रविण उर्फ अल्केश प्रकाश बडोदेकर, वय ३५ वर्ष, रा. भुगाव निपाणी, ता. नरखेड, जि. नागपूर २. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी येथे** सागर मोरेश्वर नेहारे, वय ४० वर्ष, रा. आडेगाव ता. हिंगणा, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे २ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे

विनायक गोपालराव येचीलवार, वय ३० वर्षे, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी अक्षय अशोक खेडकर, वय ३२ वर्ष, रा. कोदामेंढी, ता. मौदा., जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी १. मनोज चंद्रभान बोरकर, वय ४० वर्ष, रा. संताजी नगर धर्मराज शाळेचे पाठीमागे कांद्री, ता. पारशिवनी, जि. नागपूर २. नंदलाल साहानी, रा. फुकट नगर, कांद्री कन्हान यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १२३३० मिली देशी दारू, २३ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ७५४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर